**अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना विविध मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र.मान्यता-२०२२/प्र.क्र.१४७/तांशि-४**
मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १८ ऑगस्ट, २०२२.

<u>वाचा</u> : संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/मान्यता/२०२२/७४८, दि.०२.०८.२०२२.

**<u>प्रस्तावना</u> :**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन संचालक, तंत्रशिक्षण यांनी संदर्भाधीन दि.०२.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये विद्यमान कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थाना द्यावयाच्या विविध शासन मान्यतांबाबत प्रस्तावित केले आहे.

संचालक, तंत्रशिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सोबतच्या Annexure - A ते J मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून संचालक, तंत्र शिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे, शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे Annexure - A ते J मधील संस्थांना प्रचलित अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | अर्ज / प्रस्ताव | सहपत्र (Annexure) |
|---|---|---|
| १ | नवीन संस्था सुरू करणे. | A |
| २ | विद्यमान संस्थामध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ, तुकडी पुर्ण करणे, प्रवेश क्षमता पुर्ववत करणे इत्यादी. | B |
| ३ | विद्यमान संस्थेतील अभ्यासक्रम बंद करणे, तुकडी बंद करणे, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत घट करणे. | C |
| ४ | विद्यमान व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थातील अभ्यासक्रमांना ओसीआय / पीआयओ/ विदेशी / आखाती देशातील भारतीय कामगारांच्या मुलांकरीता [OCI/PIO/Foreign Nationals / Children of Indian Workers in the Gulf Countries] व अनिवासी भारतीयांच्या मुलांकरीता [NRI] च्या नवीन जागांना व पूर्वीच्या जागांना मुदतवाढ देणे. | D |

| अ.क्र. | अर्ज / प्रस्ताव | सहपत्र (Annexure) |
|---|---|---|
| ५ | अभ्यासक्रमाच्या नावात बदल करणे. | E |
| ६ | संस्थेच्या नावात बदल करणे. | F |
| ७ | ट्रस्ट / सोसायटी च्या नावात बदल करणे व शैक्षणिक संस्थेचे नांव व पत्ता बदल करणे. | G |
| ८ | एकाच व्यवस्थापनामार्फत सुरू असलेल्या संस्था विलिन [Mergering] करणे. | H |
| ९ | एनएसक्युएफ अंतर्गत बी. व्होकेशनल अभ्यासक्रमाचे नवीन अभ्यासक्रम, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे. | I |
| १० | एनएसक्युएफ अंतर्गत सध्या सुरू असलेले बी. व्होकेशनल अभ्यासक्रम बंद करणे, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमता कमी करणे. | J |

अटी व शर्ती:-

१) सदर मान्यता कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित खाजगी संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत . तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१०) एकाच व्यवस्थापनाखालील विलीन होणाऱ्या संस्थांमधील अभ्यासक्रमांची प्रस्तुत विलीनीकरणानंतरची प्रवेश क्षमता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता मंजूर केल्या प्रमाणे रहील.

११) ज्या संस्थेतील अभ्यासक्रम बंद होणार आहेत अशा संस्थेकडून शासनाची वसूली अद्यापही थकीत असल्यास त्याचा भरणा करणे संस्था प्रमुखांवर बंधनकारक राहील.

१२) संस्थेमध्ये सदर अभ्यासक्रम राबविण्यासाठी आवश्यक स्थावर जंगम मालमत्तेविषयी या संस्थेने शासनाकडून किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतले असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची परतफेड करण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

१३) संस्थेतील संबंधीत अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने बंद करताना त्या सस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना व माजी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याची व परीक्षेस बसण्याची व्यवस्था करणे संस्थेवर बंधनकारक राहील. संस्थेने या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून न दिल्यास, संस्थे विरूध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल व शासनाकडे ठेवलेली संचित ठेव शासन जमा करण्यात येईल.

१४) संबंधीत बंद होणाऱ्या अभ्यासक्रमासाठी नियुक्त केलेल्या संस्थेतील शिक्षक व कर्मचारी यांना नियमानुसार देय असलेले वेतन, वेतन भरपाई व अन्य आर्थिक प्रदानांचे भुगतान करणे संस्थेस बंधनकारक राहील.

१५) बी.व्होक. अभ्यासक्रमांसदर्भात कम्युनिटी कॉलेज योजनेंतर्गत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी **B.Voc.(NSQF Level VII)** पदवी अभ्यासक्रम राबविण्यासाठी तयार केलेले विशेष नियम, अटी व शर्तीचे पालन करणे संबंधित संस्थेस व स्कील नॉलेज प्रोव्हायडर यांना बंधनकारक राहील.

१६) बी.व्होक. अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक राहील.

१७) बी.व्होक. अभ्यासक्रमाचे प्रवेश हे अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद ,नवी दिल्ली यांनी त्यांच्या अप्रुव्हल प्रोसेस हॅण्डबुक २०२२-२०२३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संस्थास्तरावर करावेत.

१८) बी.व्होक. अभ्यासक्रमाच्या मुदतवाढीस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता घेण्याची कार्यवाही संस्थेने नियमाप्रमाणे करावी.

१९) बी.व्होक. अभ्यासक्रम कम्युनिटी कॉलेज योजनेंतर्गत राबविण्यात येत असल्याने व विद्यार्थ्यांचे प्रवेश संस्थास्तरावर होत असल्याने सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती सर्व संस्थांना लागू राहतील.

३. ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये या शासन मान्यतेनुसार अभ्यासक्रमाचा समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण यांनी आवश्यक ते आदेश पुढील १५ दिवसाच्या आत निर्गमित करावेत.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२०८१८१०३६१७८४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by NITIN JYOTINATH GHIRATKAR
Date: 2022.08.23 15:20:52 +05'30'

**(नि.ज्यो.घिरटकर)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
३. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
५. संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
७. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
८. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
९. निवड नस्ती/तांशि-४

| Sr. NO. | Permanent Id | Institute Code | Institute Name | Institute Address | District | Institution Type | Minority Institute | Women Institute | Program | University | Level | Name of Course | Intake Approved for 2021-22 | Intake Approved for 2022-23 | Variation | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 183 | 1-4836141 | 6304 | ADARSH INSTITUTE OF TECHNOLOGY & RESERCH CENTRE. | A/P:- KHAMBALE(BHA),VITA. GAT NO. 421, TAL - KHANAPUR, DIST- SANGLI, PIN- 415311 | SANGLI | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | ARTIFICIAL INTELLIGENCE AND MACHINE LEARNING | 0 | 60 | 60 | New Course |
| 184 | 1-4836141 | 6304 | ADARSH INSTITUTE OF TECHNOLOGY & RESERCH CENTRE. | A/P:- KHAMBALE(BHA),VITA. GAT NO. 421, TAL - KHANAPUR, DIST- SANGLI, PIN- 415311 | SANGLI | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | ELECTRICAL AND COMPUTER ENGINEERING | 0 | 60 | 60 | New Course |
| 185 | 1-487157891 | 6313 | JAYWANT COLLEGE OF ENGINEERING AND POLYTECHNIC | GAT NO,319/1,320,KILLEMACHND RAGAD TAL- WALWA DIST- SANGLI | SANGLI | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | MECHANICAL ENGINEERING | 30 | 60 | 30 | Increase in Intake |
| 186 | 1-487157891 | 6313 | JAYWANT COLLEGE OF ENGINEERING AND POLYTECHNIC | GAT NO,319/1,320,KILLEMACHND RAGAD TAL- WALWA DIST- SANGLI | SANGLI | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | CIVIL ENGINEERING | 30 | 60 | 30 | Increase in Intake |
| 187 | 1-487157891 | 6313 | JAYWANT COLLEGE OF ENGINEERING AND POLYTECHNIC | GAT NO,319/1,320,KILLEMACHND RAGAD TAL- WALWA DIST- SANGLI | SANGLI | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | COMPUTER ENGINEERING | 30 | 60 | 30 | Increase in Intake |
| 188 | 1-487157891 | 6313 | JAYWANT COLLEGE OF ENGINEERING AND POLYTECHNIC | GAT NO,319/1,320,KILLEMACHND RAGAD TAL- WALWA DIST- SANGLI | SANGLI | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | ELECTRICAL ENGINEERING | 30 | 60 | 30 | Increase in Intake |
| 189 | 1-8019451 | 6315 | SANJEEVAN ENGINEERING & TECHNOLOGY INSTITUTE | SANJEEVAN KNOWLEDGE CITY, SOMWAR PETH, TAL. PANHALA, DIST. KOLHAPUR. PIN 416201 | KOLHAPUR | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | COMPUTER SCIENCE AND ENGINEERING | 60 | 120 | 60 | Increase in Intake |
| 190 | 1-4156934 | 6317 | SHARAD INSTITUTE OF TECHNOLOGY COLLEGE OF ENGINEERING | BEHIND ONKARESHWAR MANDIR, YADRAV-ICHALKARNJI TAL-SHIROL DIST.- KOLHAPUR MAHARASHTRA PIN- 416121 | KOLHAPUR | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | COMPUTER SCIENCE AND ENGINEERING | 120 | 180 | 60 | Increase in Intake |
| 191 | 1-9647544 | 6319 | S. B. PATIL COLLEGE OF ENGINEERING | A/P-VANGALI, TAL-INDAPUR, DIST-PUNE 413106 | PUNE | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | ARTIFICIAL INTELLIGENCE (AI) AND DATA SCIENCE | 0 | 30 | 30 | New Course |
| 192 | 1-4917161 | 6320 | K J COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT RESEARCH | SURVEY NO. 25&27 , PISOLI, NEAR BAPDEO GHAT,POST-YEWALEWADI TAL : HAVELI DIST : PUNE -411048 | PUNE | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | UNDER GRADUATE | ELECTRONICS AND TELECOMMUNICATION ENGINEERING | 30 | 60 | 30 | Restoration |
| 193 | 1-4351754 | 6321 | VIDYA VIKAS PRATISHTHAN INSTITUTE OF ENGINEERING & TECHNOLOGY,SOLAPUR | SOREGAON-DONGAON ROAD,SOREGAON,SOLAPUR-413004 | SOLAPUR | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | ARTIFICIAL INTELLIGENCE (AI) AND DATA SCIENCE | 0 | 60 | 60 | New Course |
| 194 | 1-413241561 | 6419 | NUTAN COLLEGE OF ENGINEERING AND RESEARCH | "VISHNUPURI",TALEGAON DABHADE , TALEGAON STATION TAL MAVAL DIST PUNE | PUNE | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | COMPUTER SCIENCE AND ENGINEERING | 120 | 180 | 60 | Increase in Intake |
| 195 | 1-4210711 | 6545 | ARVIND GAVALI COLLEGE OF ENGINEERING | GAT NO. 247, PANMALEWADI, POST - VARYE, | SATARA | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | COMPUTER SCIENCE AND ENGINEERING | 60 | 120 | 60 | Increase in Intake |

Annexure C
Higher and Technical Education Department Government Resolution No.Manyata-2022/C.R.147/TE-4, Dated- 18 August, 2022
List of Course Closure / Division Closure / Reduction Intake in Existing UG and PG course for A.Y. 2022-23

| Sr. No. | Institute Code | Permanent_Id | Institute Name | Institute_Address | District | Institution Ty | Minority Institute | Women Institute | Program | University | Level | Name of Course | Intake Approved for 2021-22 | Intake Approved for 2022-23 | Variation | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 226 | 6320 | 1-4917161 | K J COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT RESEARCH | SURVEY NO. 25&27 , PISOLI, NEAR BAPDEO GHAT,POST- YEWALEWADI TAL : HAVELI DIST : PUNE - 411048 | PUNE | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | POST GRADUATE | DESIGN ENGINEERING | 24 | 12 | -12 | Decrease |
| 227 | 6320 | 1-4917161 | K J COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT RESEARCH | SURVEY NO. 25&27 , PISOLI, NEAR BAPDEO GHAT,POST- YEWALEWADI TAL : HAVELI DIST : PUNE - 411048 | PUNE | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | University of Pune, Pune | POST GRADUATE | COMPUTER ENGINEERING | 24 | 12 | -12 | Decrease |
| 228 | 6321 | 1-4351754 | VIDYA VIKAS PRATISHTHAN INSTITUTE OF ENGINEERING & TECHNOLOGY,SOLAPUR | SOREGAON- DONGAON ROAD,SOREGAON,SOLAPUR-413004 | SOLAPUR | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | POST GRADUATE | COMPUTER SCIENCE & ENGINEERING | 18 | 9 | -9 | Decrease |
| 229 | 6419 | 1-413241561 | NUTAN COLLEGE OF ENGINEERING AND RESEARCH | "VISHNUPURI",TALEGAON DABHADE , TALEGAON STATION TAL MAVAL DIST PUNE | PUNE | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | MECHANICAL ENGINEERING | 120 | 60 | -60 | Division Closure |
| 230 | 6545 | 1-4210711 | ARVIND GAVALI COLLEGE OF ENGINEERING | GAT NO. 247, PANMALEWADI, POST - VARYE, | SATARA | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | MECHANICAL ENGINEERING | 120 | 90 | -30 | Division Closure |
| 231 | 6545 | 1-4210711 | ARVIND GAVALI COLLEGE OF ENGINEERING | GAT NO. 247, PANMALEWADI, POST - VARYE, | SATARA | Private-Self Financing | N | N | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | ELECTRONICS AND TELECOMMUNICATIONS ENGINEERING | 60 | 30 | -30 | Division Closure |

**अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**शासन निर्णय** क्र. टिईएम-२०१०/(१६५/१०)/तांशि-४,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : - ३० जून, २०१०.

संदर्भ :- १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेली यादी.
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सादर केलेले पत्र क्र. २/एनजीसी/अभातांशिप-यादी/शा.मान्यता/२०१०/१२४१, दिनांक ३० जून, २०१०

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संकेत स्थळावर शैक्षणिक वर्ष २०१०-११ करिता खाली नमूद केलेल्या संस्थेस नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १ | अरविंद गवळी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, गट नं. २४७,पानमाळेवाडी, पो. वर्ये, जिल्हा सातारा-४१५००१ | १) इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० |
| | | २) कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरींग | ६० |
| | | ३) सिव्हील इंजिनिअरींग | ६० |
| | | ४) इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग | ६० |
| | | ५) मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० |
| | | एकूण | ३०० |

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २०१०-११ नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

८) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
संबंधित संस्था (संचालकांमार्फत )
प्रत माहितीसाठी
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती.

**शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयांतर्गत नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास शासन मान्यता देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०११/(१५७/२०११)/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ३० जून, २०११.

संदर्भ : १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित केलेली यादी.
२) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०११/ ३२२५-अ, दिनांक ३० जून, २०११.

**शासन निर्णय** : शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात सुरु असलेल्या खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयांतर्गत नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** प्रमाणे मान्यता दिलेली आहे. सदर माहिती संचालक, तंत्रशिक्षण यांनी शासनास त्यांच्या दिनांक ३० जून, २०११ च्या पत्रान्वये सादर केली आहे. त्यास अनुसरुन शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेली मान्यता विचारात घेऊन सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मधील संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास व अतिरिक्त नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधानकाररित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतुदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक (तंत्रशिक्षण) यांचेकडे आवश्यक ती संचित ठेवय संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पध्दतीनुसार करण्यात येतील.

ARVIND GAVALI COLLEGE OF ENGINEERING, SATARA
EN-6545

Dr. Vilas Pharande
Principal
Arvind Gavali College Of Engineering
Panmalewadi, Satara

६)	शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७)	संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट, १९४८ च्या कलम १२ मधील तरतुदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

८)	रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

९)	याशिवाय संचालक (तंत्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१०)	दुस-या पाळीसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, महाराष्ट्र शासन व संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विहित केलेल्या/करावयाच्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक नाहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, (संचालकांमार्फत).
कुलसचिव, (संचालकांमार्फत).
संबंधित संस्था (संचालकांमार्फत)

**<u>प्रत माहितीसाठी</u>** :-
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१.
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डिंग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई.
निवडनस्ती/तांशि-४

C:\Documents and Settings\v\My Documents\TE ४\GR\Intake variation.doc

ARVIND GAVALI COLLEGE OF ENGINEERING, SATARA
EN-6545

Dr. Vilas Pharande
Principal
Arvind Gavali College Of Engineering
Panmalewadi, Satara

| Inst Code | Name of the Institute | Year of Est | Course Type Name | Course Type Details | Course Name | Course Start Year | 2010-2011 | 2011-2012 | Variation |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6460 | Shri Chanakaya Education Society, Indira School of Business Studies, Pune. | 2006 | P.G.D.M | Regular First Shift | Marketing | 2006 | 60 | 0 | -60 |
| 6500 | Institute of Management(PGDM), Khandala, Satara | 2009 | P.G.D.M | Regular First Shift | Post Graduate Diploma In Management | 2009 | 60 | 0 | -60 |
| 6515 | Chaudhary Attarsingh Yadav Memmorial Education Trust's Siddhant College Of Pharmacy, Sudumbare, Maval, Pune | 2006 | Master of Pharmacy | Regular First Shift | Pharmaceutics | 2010 | 0 | 18 | 18 |
| 6515 | Chaudhary Attarsingh Yadav Memmorial Education Trust's Siddhant College Of Pharmacy, Sudumbare, Maval, Pune | 2006 | Master of Pharmacy | Regular First Shift | Pharmacutical Chemistry | 2010 | 0 | 18 | 18 |
| 6533 | Marathwada Mitra Mandal's College of Architecture, Pune | 1985 | Bachelor of Architecture | Regular First Shift | Architecture | 1985 | 40 | 60 | 20 |
| 6536 | Vivekanad Institute of Technology Padmbhushan Vasantdada Patil College of Architecture, Pune | 1995 | Bachelor of Architecture | Regular First Shift | Architecture | 1995 | 30 | 80 | 50 |
| 6545 | Samarth Education Trust's Arvind Gavali College Of Engineering Varye,Satara. | 2010 | Bachelor of Engineering ( B. E. ) | Regular First Shift | Mechanical Engineering | 2010 | 60 | 120 | 60 |
| 6547 | Suryadatta Educational Foundation, Suryadatta Institute of Management and Mass Communication, Pune | 2010 | M.B.A/M.M.S | Regular First Shift | M. B. A. | 2011 | 0 | 60 | 60 |
| 6548 | Suryadatta Educational Foundation, Suryadatta Institute of Business Management and Technology, Pune | 2010 | P.G.D.M | Regular First Shift | Retail & FMCG | 2010 | 60 | 0 | -60 |

ARVIND GAVALI COLLEGE OF ENGINEERING, SATARA ★ EN-6545

Dr Vilas Pharande
Principal
Arvind Gavali College Of Engineering
Panmalewadi, Satara